# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- ०४
## सभावृत्तांत

दिनांक - ०२/११/२०१७ वेळ दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०२/११/२०१७रोजी दुपारी २.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१) मा.फुगे भिमाबाई पोपट - अध्यक्षा**

२) मा.सुवर्णा विकास बुर्डे

३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

४) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू

५) मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन

६) मा.गायकवाड निर्मला मनोज

७) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

८) मा.बारसे प्रियांका प्रविण

९) मा.श्री.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.योगेश कडूसकर - क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.प्रमोद काशीकर – प्रशासन अधिकारी मा.श्री.जीवन गायकवाड, कार्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.बोरावके डी.एच. उपअभियंता (स्थापत्य). मा.श्री.प्रविण घोडे – उपअभियंता (विद्युत) मा.श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत, मा.श्री.व्ही.सी.काळे- उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.क्षीरसागर आर.व्ही. क.अभियंता (स्थापत्य), मा.श्री.ए.के. कोंडे – उपअभियंता (पा.पु.),मा.श्री.एस.आय.खोंद्रे - उपअभियंता झोनिपू स्थापत्य, मा. श्री. कोतकर पी.बी.क.अभियंता (पा.पु.), मा.श्री.आर.व्ही शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.डी.डी.गवळी - उपअभियंता (ज.नि.), श्री.बेळगांवकर एस.एस. क.अभियंता (पा.पु.), श्री.कातोरे–पी.बी.-क.अभियंता (विद्युत), श्री.पवार व्ही.एस क.अभियंता (विद्युत) मा.श्री. एम.बी.निकम-लेखाधिकारी, मा.श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), मा.श्री.ए.आर.धडस - क.अभियंता (ज.नि.), श्री.गनबोटे ए.पी. क.अभियंता(स्थापत्य), मा.श्री.निखील फेंडर क.अभियंता,मा. श्री.वाडकर एस. व्ही. क. अभियंता (स्थापत्य उद्यान.),मा.व्ही.के.जाधव- उपअभियंता (स्थापत्यउद्यान), मा.एल.जे.म्हेत्रे – उद्यान सहाय्यक, मा.श्री.बाजीराव लांडगे- पीएमपीएमएल भोसरी आगार, श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक माध्य.विद्यालय,भोसरी, मा.व्ही.एम.ताकवले - क.अभियंता (स्थापत्य), श्री.जी.जी.दसगुडे- मुख्याध्यापक माध्य.विद्यालय, भोसरी, श्रीम.जे.आर.पवळे- समुह संघटक, ना.वि.यो.पिंपरी, सौ. भोज जे.एस.- क्रीडा पर्यवेक्षक, श्री.आर.पी.डामसे- मलेरिया निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-----**

**विषय क्रमांक – १)** प्रभाग क्र. ७ मधील रस्त्याला/कमानीला नांव देणेबाबत. मा.सौ.भिमाबाई पोपट फुगे यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक –** २) प्रभाग क्र. ४ सीएमई भागातून येणारे पाणी आरसीसी पाईप लाईनद्वारे नदीमध्ये सोडणेबाबत. मा.सौ. हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दि.२/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक – ३)** प्रभाग क्र. ३ काळजेवाडी येथील जुनी शाळेची इमारत पाडणेबाबत. मा.सौ. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्र.

**------**

अ) दिनांक ०५/१०/२०१७ रोजीची रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रम पत्रिका ०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक- १

दिनांक - ०२/११/२०१७

सूचक- मा. श्री.संतोष लोंढे अनुमोदक – मा.श्री.विकास डोळस

संदर्भ – प्रभाग क्र. ७ मधील रस्त्याला/कमानीला नांव देणेबाबत. मा.सौ.भिमाबाई पोपट फुगे यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.७ मधील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयामागील पुणे नाशिक रोड ते गाव जत्रा मैदान रस्त्यावर स्वागत कमान उभारुन त्या रस्त्याला व कमानीला ह.भ.प. गायनाचार्य कै. नामदेवराव जयवंतराव माने (पाटील) यांचे नांव देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक- २

दिनांक - ०२/११/२०१७

सूचक- मा.श्री.विकास डोळस अनुमोदक – मा. श्री.लक्ष्मण उंडे

संदर्भ - प्रभाग क्र. ४ सीएमई भागातून येणारे पाणी आरसीसी पाईप लाईनद्वारे नदीमध्ये सोडणेबाबत. मा.सौ. हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ४ दिघी बोपखेल गावांमधील रामनगर येथील दाट लोकवस्तीच्या पुर्व बाजूने नैसर्गिक, मुख्य, मोठा व खोल नाला आहे. सदर नाल्यातून उत्तरेकडून सी.एम.ई. भागातून येणारे पाणी दक्षिणेकडील नदीमध्ये वाहत जाते. रामनगर लोकवस्तीच्या पश्चिम बाजूने (स.नं.०३,०२ आणि०५ मधून) उत्तरेकडून सी.एम.ई. भागातून येणारे पाणी दक्षिणेकडील नदीमध्ये वाहत जात असताना सदरची जमिन उथळ असल्याने ब-याच ठिकाणी पाणी साठून राहते, साठलेल्या पाण्यामध्ये दलदलीची परिस्थिती निर्माण होते त्यामुळे या भागात अनावश्यक झाडेझुडपे उगवली आहेत. अशा ठिकाणी नागरीक कचरा टाकून हा परिसर अस्वच्छ होत आहे. परिणामी नागरीकांना डेंग्यू, मलेरिया, अशा प्रकारच्या रोगांना बळी पडावे लागत आहे. व या ठिकाणी दलदल सदृ:श भागातील घाण साफ करणेकरीता मोठा रस्ता नसल्याने या ठिकाणी आरसीसी पाईप लाईन टाकण्याकरीता या परिसरातील

नागरीकांच्या हरकत नसल्याने आणि पाईप लाईनवरुन ६.०० मी. रस्ता विना मोबदला तयार करण्यास जागा मालक तयार आहेत व यामुळे स्वच्छतेचा व वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

सबब प्रभाग क्र. ४ दिघी बोपखेल गावांमधील रामनगर येथील दाट लोकवस्तीच्या पुर्व बाजूने रामनगर लोकवस्तीच्या पश्चिम बाजूने (स.नं.०३,०२ आणि ०५ मधून) उत्तरेकडून सी.एम.ई. भागातून येणारे पाणी दक्षिणेकडील नदीमध्ये सोडण्यासाठी मोठया स्वरुपात आरसीसी पाईप लाईन करणे बाबतच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक- ३

दिनांक - ०२/११/२०१७

सूचक- मा.सौ. प्रियांका बारसे अनुमोदक – मा. सौ. हिराबाई (नानी) घुले

संदर्भ – प्रभाग क्र. ३ काळजेवाडी येथील जुनी शाळेची इमारत पाडणेबाबत.

मा.सौ. सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक २/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ३ काळजेवाडी येथील जुन्या शाळेची इमारत फार जुनी झालेली आहे. व ती १८ मीटर डी.पी. रस्त्यात बाधीत होत आहे. त्याचप्रमाणे या शाळेतील विद्यार्थ्यांची म.न.पा.ने नव्याने बांधलेल्या इमारतीमध्ये बसण्याची नव्याने व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी सदरची जुनी इमारत पाडणे कामीच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

माहे २ नोंव्हेंबर २०१७ च्या इ क्षेत्रीय कार्यालयातील मासिक सभेत मा.अध्यक्षा व सर्व सन्मा.नगरसदस्य यांनी सर्व कामाचे आदेश ज्या ज्या ठेकेदारांना दिलेले आहेत. त्या त्या ठेकेदारांच्या बाबत असलेल्या तक्रारींचा आढावा घेणे, नागरीकांच्या समस्यांचे निराकारण करणे याकरीता सभेस उपस्थित राहणेकामी पुढील महिन्याच्या मासिक सभेनंतर सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन माहे डिसेंबर २०१७ च्या इ क्षेत्रीय कार्यालयातील पुढील महिन्याच्या मासिक सभेनंतर तक्रारींचा आढावा घेणे, नागरीकांच्या समस्यांचे निराकारण करणे याकरीता सर्व सबंधीत ठेकेदारांना सभेस उपस्थित राहणेकामी मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी सर्व संबंधीत अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत.

यानंतर मा.सभापती यांनी आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
भिमाबाई पोपट फुगे
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९.
क्र-इक्षेका/कावि/४/१२४४/२०१७
दिनांक- ०६/११/२०१७

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी भोसरी – ३९.
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.